नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०४/२०२५ (सोमवार)

## खापरखेडा पोलीस स्टेशन अपराध क्रमांक ३३४/२०२५ या गुन्हयाचे तपासाकरीता विशेष तपास पथक गठित ,अजुन २ आरोपीतांना अटक

दिनांक २७/०४/२०२५ रोजी श्री अनिल मस्के , सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर आणि श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या पथकाने वलनी येथे केलेल्या संयुक्तीक कारवाईत पोलीसांनी ५ अग्निशस्त्रे, ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुगळया, ८ अॅड्रॉईड फोन , सिमकार्ड आणि १०२८.०५ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा सदृश्य वनस्पती व ईतर साहीत्य असा एकुण २,७१,८०० रु किंमती चा मुद्देमाल जप्त केला होता.

**सदर प्रकरणी आरोपी नामे १) आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे, वार्ड नं. ३ चनकापूर, २) अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग, वय २९ वर्षे, रा. वलनी, ३) गब्बर दत्तूजी जुमळे, वय ३०वर्षे, रा. वलनी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अपराध क्रमांक ३३४/२०२५ कलम ३,५,२५ भारतीय शस्त्र अधिनियमसहकलम ८ (सी) ,२० (बी) (२), २९ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद तिन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

**सदर गुन्हयाचे गांर्भिय लक्षात घेता मा. मा.श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचे तपास कामी विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे. सदर विशेष तपास पथकाचे प्रमुख श्री अनिल मस्के , सहा. पोलीस अधिक्षक, तथा उपविभागिय पोलीस अधिकारी , सावनेर , विशेष तपास पथाकाचे सहायक श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान आणि सदर गुन्हयाचे तपास अधिकारी म्हणुन श्री अरविंद कतलाम,पोलीस निरीक्षक,(प्रभारी अधिकारी) खापरखेडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नमुद विशेष तपास पथकाने सदर गुन्हयाचा सखोल तपास सुरू केला असुन सदर**

**प्रकरणी अजुन दोन आरोपी नामे १. रोहीत देशराज सुर्यवंशी,वय ३२ वर्षे,रा वार्ड क्रं ३, चनकापुर ता. सावनेर आणि २. उदयभान गंगासागर चव्हाण ,वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्रं ६ वलनी यांना अटक केली आहे. नमुद पाचही आरोपी पोलीस कोठडी रिमांड मध्ये असुन सदर विशेष तपाथ पथक नमुद गुन्हयाचा तपास करीत आहे.**

## महीलेचा विनयभंग करणाऱ्या आप्तेष्टा विरूध्द गुन्हा नोंद करून बुटीबोरी पोलीसांनी २४ तासाचे आत दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले.

**पोलीस स्टेशन बुटबोरी** :— दिनांक २७/०४/२०२५ रोजी पिडीत फिर्यादीने पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे येवुन रिपोर्ट दिली की, फिर्यादी हिचे पती काही वर्षापुर्वी मरण पावले असुन दिनांक २६/०४/२०२५ रोजी रात्रीचे १०:०० वाजेच्या सुमारास फिर्यादी ही घराचा दरवाजा उघडा ठेवुन एकटीच घरात झोपली असातांना दिनांक २७/०४/२०२५ चे रात्री ०२:०० वाजेच्या सुमारास कोणीतरी तिच्या घरात घुसुन तिला चुकीच्या पध्दतीने स्पर्श करून तिचा विनयभंग केल्याने तिला जाग आली तेव्हा तिने बघितले की,नमुद आरोपी हा तिचा अप्तेष्ट (नातेवाईक) आहे. त्यामुळे पिडीतेने आरडाओरडा केला असता तिच्या घराचे अंगणात झोपलेले तिचे ईतर नातेवाईक हे पिडीतेच्या रूमकडे गेले आणि आरोपीला बाहेर काढले. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बोरी येथे अपराध क्रमांक ४४७/२०२५ कलम ७४ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

**सदर घटनेचे गांर्भीय लक्षात घेता मा. श्री रमेश धुमाळ ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री दिपक अग्रवाल ,उपविभागिय पोलीस अधिकारी तथा सहा.पोलीस अधिक्षक ,नागपुर विभाग यांनी प्रभारी अधिकारी ,पोलीस स्टेशन बोरी श्री प्रतापराव भोसले, पोलीस निरीक्षक यांना नमुद गुन्हयाचे तपासकामी विशेष पथक गठित करण्याबाबत आदेशित केले. त्यानुसार महीला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती कुमुदीनी पाथोडे, पोहवा अरविंद चव्हाण बनं १८८७, पोहवा युनुस खान १७४, पोहवा कृणाल ठाकुर बनं १९५५, पोअं दशरथ घुगरे बनं २२२५ यांचे विशेष पथक गठित करण्यात आले. नमुद पथकाने आरोपीस पोलीस स्टेशनला आणुन त्यावर कायदेशिर कारवाई केली. तपासी अंमलदार पोहवा अरविंद चव्हाण बनं १८८७ यांनी नमुद आरोपीविरूध्द सबळ पुरावे गोळा**

**करून गुन्हा नोंद झाल्यापासुन २४ तासचे आत नमुद आरोपी विरूध्द दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ५५ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक २७/०४/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्र १ :—** पोलीसांनी पोलीस स्टेशन टी पॉईट येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहन **१० चक्का टिप्पर क्र. एम.एच ४९— १२९९** मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला आणि त्याचा साथीदार क्लिनर यांना नाव पत्ता विचारला असता वाहन चालक **नामे प्रशांत गुलाबराव चाके, वय ३८ वर्षे, रा.सालई गोधनी, पाचगाव, नागपुर आणि क्लिनर नामे अभिषेक जयंत चकोले, वय २० वर्षे, रा. पारडगाव, पोस्ट मकरधोकडा ता. उमरेड अशी माहीती प्राप्त झाली** त्यांना परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली **असता वाहन मालक नामे मिलींद तेलंग, रा.भांडे प्लॉट नागपुर अशी माहीती प्राप्त झाली**. पोलीसांनी पंचासमक्ष **१) ६ ब्रास रेती आणि २) १० चक्का टिप्पर एम.एच ४९— १२९९ असा एकुण १५,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्र २ :—** भिवापुर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **गोंडबोरी शिवारात भिवापुर कडुन उमरेड कडे संशयीत वाहन ट्रक क्रमांक एम एच ४९—बी झेड २३००** हे जाताना मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता वाहन **चालक मोहम्मद शमशाद अयुग खान, वय २७ वर्षे, रा.खरबी, गरीब नवाज चौक बहादुरा रोड नागपुर,** अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता **वाहन मालक नामे अबरार अहमद सुलतान अहमद रा.प्लॉट नं १३ खरबी रोड, बजरंग हाउसिंग सोसायटी न्यु खरबी ले आउट, हुडकेश्वर नागपुर अशी**

**माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) ९ ब्रास रेती आणि २) ट्रक क्रमांक एम एच ४९—बी झेड २३०० असा एकुण ४०,४५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाईमध्ये पोलसांनी २ वाहनासह १५ ब्रास रेती असा एकुण ५५,७५०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी नमुद आरोपी वाहन चालक , क्लिनर आणि वाहन मालक अशा ५ आरोपीतांविरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अधिनियम सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हानः—** दिनांक २७/०५/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, आरोपी **नामे अफजल अजीज शेख, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र.०३ शिवाजीनगर, पिपरी कन्हान** याने त्याचे घरात महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला प्रतिबंधित सुगंधीत तंबाखुची साठवणुक करून ठेवली आहे. अशी माहिती प्राप्त होताच कन्हान पोलीसांनी तात्काळ शिवाजीनगर पिपरी कन्हान येथे जावुन पंचासमक्ष नमुद आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपीच्या घरात दिवानमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखु मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष **सुगंधीत बागबान तबांखू ४७** चे एकून १४ टिनचे डब्बे, प्रत्येकी ५००ग्रॅम असा एकूण किंमती. **१०,१५०** /— रुपये**चा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**आरोपी नामे अफजल अजीज शेख, वय २६ वर्षे रा. वार्ड क्र.०३, शिवाजीनगर, पिपरी कन्हान याचे विरूद्ध पोस्टे कन्हान येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा माणके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन बेला** :– दिनांक २७/०४/२०२५ रोजी बेला पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, आष्टा मार्गे जसापुरा फाटयाकडे पांढऱ्या रंगाच्या कारने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा जसापुर फाटा ते आष्टा रोडवर किशोर मेंगरे च्या शेताजवळ नाकाबंदी केली असता पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी रिट्स कार क्रमांक एम. एच. ३१ इ. यु. ६५३९ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात देशीदारू मिळुन आली. आरोपी नामे **अजय वामन हजारे, वय ४५ वर्षे, रा. सातगाव किन्हाळा, बुट्टीबोरी, ता हिंगणा, जि. नागपुर** हा अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. **पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारु लावणी संत्रा कंपनीची १८० मिली च्या १६० नीपा, ९० मिली च्या ३५० नीपा ३) देशी दारु प्रीमीयम नं १ कंपनीची प्रत्येकी ९० मिलीच्या १६० नीपा ४) मारुती सुझुकी रिट्स कार क्रमांक एम. एच. ३१ इ. यु. ६५३९ असा एकुण किंमती १,१९,०५०/– रुपयेचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन बेला येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## मा.प्रथमवर्ग न्यायालय,कुही यांनी आरोपी विरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कुही श्री नरेश देशमुख यांनी आरोपी नामे ऋषीकेश विठ्ठल खडसे रा. प्लॉट कं १६ ,गुलमोहर कॉलनी, पिपळा फाटा, हुडकेश्वर रोड, नागपुर याचे विरूध्द कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोस्टे कुही येथे कलम २९४,५०४,५०६,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयचा खटला मा प्रथमवर्ग न्यायालय कुही येथे सुरू असुन सदर आरोपी हा मा. न्यायालयात हजर होत नाही. मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी सदर आरोपी ला कोर्टात ०८.०५.२०२५ रोजी हजर होण्याबाबत आदेशित केले आहे. नमुद आरोपी मा. न्यायालयात हजर झाला नाही तर त्याचेवर पुढील कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने